पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. ३०

किंमत १ रुपया २५ पैसे

# शेतकरी संघटक

वर्ष ११ वे

अंक ११ वा

६ ऑक्टोबर १९९४

## पोलीस संरक्षणात पुन्हा सुरू झालेले माना येथील दारू दुकान
## शरद जोशींच्या नेतृत्वात पुन्हा बंद करण्याचा निर्धार

'दारू दुकान बंदी' आंदोलन राबवितांना माना येथे पोलिसांनी संघटना नेते, कार्यकर्त्यांवर केलेल्या अमानुष लाठीमाराच्या निषेधार्थ मुख्यमंत्री शरद पवार यांना अकोला जिल्हा प्रवेश बंदी करण्याची तसेच पोलीस संरक्षणात पुन्हा सुरू झालेला माना येथील देशी दारूचे दुकान दि. ११/१०/९४ रोजी पुन्हा बंद करण्याची घोषणा २३ सप्टेंबर रोजी शेतकरी संघटना नेते श्री. शरद जोशी यांनी अकोला येथे केली.

सौ. नलिनीताई गावंडे

प्रमिलाताई ओक हॉल मध्ये आयोजित जाहिर सभेत श्री. शरद जोशी बोलत होते. शरद पवार यांनी दारूबंदी कायद्याची जी घोषणा केली तिची अंमलबजावणी करण्यास पर्यायाने कायदा पाळण्यास शरद पवार यांचे प्रशासन कुचराई करीत आहे म्हणून स्वतः शेतकरी संघटना नेते, कार्यकर्ते, महिला आघाडी कार्यकर्त्या कायद्याची अंमलबजावणी करण्यास २१ सप्टेंबर रोजी माना येथे गेले असता पोलिसांनी त्यांच्यावर अमानुष लाठीचार्ज केला. ज्या शरद पवारांवर गंभीर आरोप आहेत, त्या शरद पवारांना मुख्यमंत्रीपदी ठेवणे ही राष्ट्रहित विरोधी बाब आहे असेही श्री. जोशी म्हणाले. माना येथील प्रकार म्हणजे 'चोराला पकडण्यास गेलेल्या धन्यावर पोलिसांचा लाठीहल्ला' या शब्दात त्यांनी संभावना केली. सरकार हे चोरांचे, गुंडांचे साथीदार झाले. अर्थकारणात लुडबूड करणारे शासन उलथवून टाकणे गरजेचे आहे.

शेतकरी संघटनेने माना येथील जे दारू दुकान उध्वस्त करून बंद केले ते पोलीस संरक्षणात पुन्हा सुरू करण्यात आले. दि. ११/१०/९४ रोजी किमान १ लाख कार्यकर्त्यांच्या सोबत आपण स्वतः माना येथील दारूचे दुकान बंद करणार आहोत असेही श्री. जोशी यांनी यावेळी आपल्या भाषणातून घोषित केले.

माना येथे महिला कार्यकर्त्यांवर पोलिसांनी केलेल्या अत्याचाराची निर्भत्सना करून जोपर्यंत शरद पवार या प्रकरणी जाहिर क्षमा मागत नाहीत तो पर्यंत त्यांना अकोला जिल्हा बंदी करण्याची तसेच त्यांची जाहिर सभा होऊ न देण्याचे कार्यकर्त्यांना आवाहन केले. १२ नोव्हेंबर ९४ रोजी नागपूर येथे आयोजित शेतकरी संघटनेच्या अधिवेशनापूर्वी महाराष्ट्रात ठिकठिकाणी

***महाराष्ट्र शासनाचं महिला धोरण शासनाला मनापासून राबवायचं आहे असंच वाटलं होतं आम्हाला. पण होरा चुकला....***

सौ. इंदिराबाई नांदुरकर

**स्वातंत्र्य वेदनारहित असत नाही**

अकोला जिल्हा रुग्णालयात सेनापती श्री. प्रकाश पोहरे यांची पाठ थोपटत असताना शरद जोशी

शेतकरी संघटना महिला आघाडी दारूबंदी आंदोलन पूर्ण करणार आहे असेही ते म्हणाले.

## आ. सरोजताई काशीकर

शरद पवार यांच्या महिला धोरणावर प्रखर टीका करीत आ. सरोजताई काशीकर म्हणाल्या की, धोरणातील दारूबंदी कितपत खरी आहे ही शंकाच आहे. फक्त महिलांची मते मिळविण्यासाठी हे धोरण आहे. या धोरणाचे शरद पवारांचे पितळ त्यांच्या प्रशासनाने व पोलिसांनीच उघडे पाडले आहे. यावेळी आ. वामनराव चटप, किशोर माथनकर यांचेही समयोचित भाषण झाले.

## प्रमिलाताई ओक हॉल घोषणांनी दणाणला

माना येथील लाठीमार घटनेच्या पार्श्वभूमीवर आजच्या श्री. शरद जोशीं यांच्या प्रमिलाताई ओक हॉल मधील सभेला जिल्ह्यातून शेकडो शेतकरी आले होते. ओक हॉल तुडूंब भरला होता. माना येथील पुन्हा सुरू झालेले दुकान दि. ११/१०/९४ रोजी पुन्हा बंद करण्याची घोषणा तसेच मुख्यमंत्री शरद पवारांना जिल्हाबंदी घोषित करताच शेतकरी संघटना जिंदाबादचे नारे ओक हॉलमध्ये लागले.

सभेपूर्वी श्री. शरद जोशी, आ. सरोजताई काशीकर, आ. वामनराव चटप, किशोर माथनकर, सौ. सुमनताई अग्रवाल यांनी जिल्हा रुग्णालयात जाऊन जखमी झालेले श्री. प्रकाश पोहरे, रावसाहेब कांबे, नलिनीताई गावंडे, इंदिराबाई नांदुरकर आदिंची भेट घेऊन त्यांची वास्तपूस केली तर जिल्हा कारागृहात जाऊन रत्नप्रभाबाई खंडारे व रामचंद्र कदम व अन्य अटकेतील कार्यकर्त्यांची भेट घेतली.

## प्रकाश पोहरे यांचे उपोषण मागे

निर्लज्ज सरकारपुढे आमरण उपोषणाचा परिणाम होत नसतो. सरकारात नैतिकता असेल तर आमरण उपोषणाद्वारे दबाव येईल. मात्र नैतिकता नसलेल्या सरकारपुढे आमरण उपोषण करून स्वतःला आत्मक्लेष देण्यात अर्थ नाही असे सांगून जिल्हा रुग्णालयात आमरण उपोषण करीत असलेले श्री. प्रकाश पोहरे यांचे उपोषण श्री. शरद जोशी यांनी सोडविले.

## ठाणेदारने घेतली सुपारी

माना येथील दारू दुकाना सभोवती पोलिसांचे संरक्षक कडे उभारणारे ठाणेदार सोनार यांनी शेतकरी संघटनेच्या आंदोलनात दारू दुकान बंद व नष्ट होऊ नये म्हणून दारू दुकान मालकाकडून दुकान संरक्षणाची सुपारी घेऊन २० हजार रु. घेतल्याची माना गावकऱ्यात चर्चा आहे. दारू दुकान बंदी बाबत सौ. रत्नकलाबाई खंडारे या महिलेने ठराव घेण्यासाठी जो पुढाकार घेतला त्यामुळेच चिडलेल्या पोलिसांनी सदर महिलेला घराबाहेर बोलावून तिला लाठ्यांनी जबर मारहाण केली.

## वरखेड येथे रास्ता रोको

तेल्हारा, (वार्ताहर) - माना येथे शेतकरी संघटना कार्यकर्त्यांवर झालेल्या आमनुष लाठीमाराच्या निषेधार्थ आज वरखेड येथे शेतकरी संघटनेतर्फे 'रास्ता रोको'

**स्वतःच्या कष्टावर जोपासलेली ही कांब**
**पगारी शिपुड्यांच्या लाठीपुढे वाकणार नाही.**

अकोला जिल्हा रुग्णालयात आपल्या मर्दुमकीच्या खुणा
शरद जोशींना अभिमानाने दाखविताना रावसाहेब कांबे

आंदोलन घेण्यात आले. सुमारे ३ तास वाहतूक ठप्प होती. या 'रास्ता रोको'त संपूर्ण गावकरी सहभागी झाले होते. 'रास्ता रोको' चे नेतृत्व करणाऱ्या हरिभाऊ म्हसाये, निळकंठ चितोडे, जनार्दन वानखडे, प्रेमराज म्हसाये, सारंगधर डापर, रामदास इंगळे यांना तेल्हारा पोलिसांनी भादवि ३४१ व मु. पो. कायदा १४३, १३५ अन्वये अटक करून नंतर जामिनावर सुटका केली.

## नगराध्यक्ष नरेंद्र पटेल यांचेकडून निषेध

नगराध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी जिल्हा रूग्णालयात जाऊन प्रकाश पोहरे, रावसाहेब कांबे यांची भेट घेतली. महिला कार्यकर्त्यांवर जो अमानुष लाठीमार पोलिसांनी केला त्याचा त्यांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त केली. माजी नगराध्यक्ष अजय तापडीया, नगरसेवक पांडुरंग कवडे, जब्बारभाई यांनीही भेटी दिल्या.

## मराठा सेवा संघातर्फे तीव्र निषेध

मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव अध्यक्ष प्रा. सुधीर बेनके, सहसचिव दिलीप साबळे, बी. टी. महल्ले, मधुकर देशमुख, राम मुळे, सुभाष शिंदे व अन्य कार्यकर्त्यांनी आज जिल्हा रूग्णालयात जाऊन जखमींची भेट घेतली. माना येथील पोलिसांनी महिला कार्यकर्त्यांवर जो अमानुष लाठीचार केला त्याचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला.

## अटक सत्र सुरूच

मुर्तिजापूर पोलिस स्टेशनला अटकेत असलेल्या ११ आंदोलकांपैकी सौ. रत्नकलाबाई खंडारे, रामचंद्र कदम यांची रवानगी अकोला कारागृहात करण्यात आली असून ६ आंदोलकांना धनज पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले त्यापैकी ३ जणांना न्यायालयीन कस्टडीत ठेवण्यात आले आहे. यात ओमप्रकाश तापडीया यांचाही समावेश आहे. धनज पोलिसांनी आणखी ३०-३५ लोकांना अटक केल्याचे समजते.

## शेतकरी संघटना विद्यार्थी आघाडीचा निषेध

माना येथे शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांवर पोलिसांनी जो अमानुष लाठीचार्ज केला त्याचा अमरावती जिल्हा शेतकरी संघटना विद्यार्थी आघाडी प्रमुख घनशाम पेठे व त्यांच्या सहकाऱ्यांनी जाहिर निषेध केला आहे.

## माना येथील दारू दुकान पुन्हा पोलीस बंदोबस्तात सुरू

आकोला, शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी उध्वस्त केलेले दारू दुकान आपले कर्तव्य तत्पर जिल्हाधिकाऱ्यांनी लगेच भेट देऊन पोलीस संरक्षणात अबकारी खात्याद्वारा सुरू केल्याचे वृत्त आहे.

पूरपिडीत अनेक गावांना जीप नाही म्हणून ट्रीप नाही या न्यायाने चिखलामुळे जाता येत नाही म्हणून भेटी न देणारे जिल्हाधिकारी उध्वस्त दारू दुकानाला मात्र तत्परतेने भेट देऊन पोलीस संरक्षणात पिणारांना सोय उपलब्ध करून देतात.

ग्रामीण भागात घासलेट मिळत नाही किंवा स्वस्त धान्याच्या दुकानात साखर, तेल मिळत नाही तेव्हा ही तत्परता दाखविल्या जात नाही हे विशेष.

## तट्ट फुगलेला पोलीस अधिकारी!

दोन गावातील दारूची दुकाने तर सहज उध्वस्त झाली पण मानाच्या सरपंच दुकानदाराने आधीच खबरदारी घेतली होती. त्याने सर्व माल सुरक्षित जागी तर नेलाच होता पण मान्याचे ठाणेदार सोनार यांनाही संरक्षणाची सुपारी देऊन ठेवली होती. पोलिसांचे कडे तोडून लोकांच्या जमावाने दुकान उध्वस्त केले तेव्हा ठाणेदार सोनार चिडून पोलिसांसह धावला. महिलांवर आठ-आठ, दहा-दहा पोलीस तुटून परले. तेव्हा प्रकाश पोहरे व रावसाहेब कांबे मध्ये धावले.

सोनार ठाणेदार एवढा गलेलठ्ठ की त्याला धावपळही करता येत नव्हती. त्या धावपळीत तो कलंडून आडवा तिडवा पडला. त्याच्या कमरेचं पिस्तुल पडलं, याचंही भान त्याला नव्हतं. शेवटी ते कुणाच्या हाती पडू नये म्हणून प्रकाश पोहरे यांनी उचलून एका जमादाराकडं दिलं. ढेरी सुटलेल्या ठाणेदाराची ही अशी ढेकणासारखी तट्ट फुगण्याची अवस्था कशाने झाले असेल याचा अंदाज लावण्याची आवश्यकता नाही.

## 'रास्ता रोको' चा निर्णय मागे

सध्या शेतीकामाचे निंदण, डवरन, रब्बी हंगाम तयारीचे दिवस आहेत. प्रदीर्घ पावसाची उघाड नुकतीच झाली आहे. अकोला जिल्ह्यात झालेल्या महापुरामुळे शेतकरी आधीच संकटग्रस्त आहे. त्यामुळे शेतकरी संघटना कार्यकर्त्यांनी 'रास्ता रोको' आंदोलन माना लाठीमार प्रकरणी करू नये असा सल्ला श्री. शरद जोशी यांनी कार्यकर्त्यांना दिला.

●

### हे सरकार कशासाठी ठेवायचे?

गणवेषधारी गुंडांनी त्यांच्याच सरकारच्या महिला धोरणातील एका कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या सौ. नलिनीताई गावंडे यांच्या पाठीची अशी अवस्था केली.

# नागपूर अधिवेशन कशासाठी ?

**नागपूर अधिवेशनाच्या निमित्ताने श्री. शरद जोशी यांचा महाराष्ट्र दौरा २० सप्टेंबरपासून सुरू झाला. या दौऱ्यातील वेगवेगळ्या भाषणातील काही निवडक मुद्दे.**

## खुली व्यवस्था व अ-राज्यवाद

खुली अर्थव्यवस्था आणि सरकारचा किमान हस्तक्षेप या संकल्पना मनमोहन सिंगांनी शोधलेल्या नाहीत.

महात्मा गांधींचा सारा विचारच अ-राज्यवादी होता. सरकार नांवाची गोष्टच नसणाऱ्या जगाचे त्यांचे स्वप्न होते. त्या स्वप्नाकडे जाण्याची पहिली पायरी म्हणून ते स्वराज्याच्या आंदोलनात उतरले. काँग्रेससारख्या राजकीय पक्षाचे नेतृत्व त्यांनी योजनापूर्वक हाती घेतले. इंग्रजांचे राज्य गेल्यानंतर अ-राज्यवादाकडे पावले टाकण्याआधीच त्यांची हत्या झाली.

येथून नेहरूंचा कालखंड सुरू झाला आणि गांधी विचाराचा सपशेल पाडाव करून समाजवादी समाजपद्धती, सार्वजनिक क्षेत्राचे प्रभुत्व, शास्त्रविज्ञानाचे महत्त्व, राष्ट्रीयीकरण अशा टप्प्याटप्प्याने साऱ्या राष्ट्राचे जीवन सरकारी कब्जात आणले. देशाच्या सुदैवाने शेतीचे सामूहिकीकरण करण्याची नेहरूंची योजना बारगळली. अन्यथा, येथेही लोकांना रशियाप्रमाणे भाकरीच्या तुकड्याची भीक मागावी लागली असती.

१९५९ साली चक्रवर्ती राजगोपालाचारी यांनी नेहरूप्रणित लायसन्स- परमिट-कोटा-इन्स्पेक्टर राज्याचा कडाडून विरोध केला आणि नेहरूंचा रस्ता विनाशाकडे जातो असे आग्रहाने मांडले.

१९८० सालापासून शेतकरी संघटनाही खुल्या व्यवस्थेचे आणि अ-सरकारी व्यवस्थेचे समर्थन करीत आहे. 'शेतकऱ्यांचे मरण, सरकारचे धोरण', 'गरिबी हटविण्यासाठी काहीही करण्याची आवश्यकता नाही, फक्त गरीबी टिकावी आणि वाढावी म्हणून सरकारने चालविलेले खटाटोप बंद झाले पाहिजेत', 'सरकार कोणतीच समस्या सोडवत नाही, सरकार हीच समस्या आहे', 'मंत्रालये सचिवालये पिशाच्यांची घरे आहेत, तेथे प्रवेश करून काहीच चांगले घडायचे नाही' या सगळ्या भूमिका शेतकरी संघटनेची निखळ अ-राज्यवादी भूमिका स्पष्ट करतात.

## सरकार कसे आहे ?

गेली शंभर वर्षे सरकारने सगळे काही पहावे, शत्रूपासून संरक्षण करावे, देशात न्याय व सुव्यवस्था टिकवावी, आणि सर्व प्रजाजनांच्या बारशापासून ते बाराव्यापर्यंत शासन हजर असावे; शिक्षणापासून ते दूरदर्शनपर्यंत सर्वत्र शासनाचेच अधिपत्य असावे या विचाराचा पगडा राहिला. कोथिंबिरीपासून जहाजांपर्यंत सगळ्या वस्तूंचे उत्पादन किती व्हावे, कसे व्हावे हे ठरवावे सरकारने, नोकरी देणार सरकार, शिक्षण देणार सरकार, लोकांनी काय पाहावे, काय वाचावे ते ठरवणार सरकार अशी सर्वंकष, सर्वशक्तिमान, सर्वज्ञ सरकारची संकल्पना तयार झाली.

प्रत्यक्षात कोणत्याही सरकारने काही कामगिरी करून दाखविली असे नाही. सरकारने ज्या ज्या विचाराला हात लावावा त्याचा त्याचा नाश व्हावा हाच अनुभव. पण सरकार अयशस्वी झाले तर त्याला दूर करावे असे कोणी म्हणत नसे. सरकार अयशस्वी झाले तर अधिक सरकार आणा अशी हाकाटी होई. सरकार ही संस्था अपयशी ठरली आहे. पण ती जिंकलीच पाहिजे अशा कैफात लोक सरकार या संकल्पनेवर अधिकाधिक जुगार हरत गेले.

सरकाराचे सामर्थ्य हा एक बुद्धिभ्रम बनला. कोणताही प्रश्न असो, तो सरकारने सोडवावा अशी भाषा सर्वांच्या तोंडी बसली. घरासमोरील कचरा हलविण्यापासून ते ऑलिंपिक खेळाडूंच्या निवडीपर्यंत, 'सरकारकडे सोपवा, सरकारकडे सोपवा' अशी हाकाटी होऊ लागली. प्रत्येक वेळी सरकार नादान ठरले आणि प्रत्येक वेळी नादानपणाचे पारितोषक म्हणून नवीन नादानी करण्यासाठी लोकांनी सरकारला साधने आणि सत्ता दिली.

## सरकार कसे असावे ?

आपल्या शरीराच्या सरकारसारखे असावे. देह हा देश समजले तर बुद्धी सरकार समजावी. शरीराच्या महत्त्वाच्या क्रिया म्हणजे पचन, श्वासोच्छ्वास, अभिसरण, चलनवलन, प्रजनन या कोणत्याच महत्त्वाच्या कामात बुद्धी हात घालत नाही. खाल्लेल्या भाकरीचे पचन होण्यासाठी क्षणाक्षणाला त्यात काय रस मिसळावे आणि कणाकणाने त्याचे रक्त कसे बनावे हे बुद्धीने ठरवायचे असते तर सारी मनुष्यजात नष्ट होऊन गेली असती. देहाच्या सरकारचे काम फार मर्यादित आहे. डास चावू लागला तर त्याला हाकलावे किंवा फटकारावे, माजलेला बैल चालून आला तर पळावे किंवा लपावे आणि बुद्धीच्या गबाळपणामुळे शरीराला नको असलेले पदार्थ पोटात गेले तर त्यावर औषधपाणी करावे एवढेच काम देहाचे सरकार करते. सरकारचे काम पोलिसाचे, लष्कराचे आणि

शरीरातील वेगवेगळ्या संस्थांचे समन्वय करण्याचे.

देशाच्या सरकारचे काम एवढेच मर्यादित पाहिजे. चोर चिलट्यांपासून दाऊद इब्राहिमपर्यंत बंदोबस्त करणे ही सरकारची जबाबदारी. परकीय हाताने देशात ढवळाढवळ करू नये हीही जबाबदारी सरकारची. आणिबाणीची परिस्थिती सोडल्यास शेती, कारखाने, व्यापार, दळणवळण, शिक्षण अशा क्षेत्रांत सरकारने हस्तक्षेप करूच नये. सरकारी हस्तक्षेपाने फायदा तर होत नाहीच, तोटाच होतो.

सत्तेतून भ्रष्टाचार अपरिहार्यपणे निघतोच. सत्ता 'जादूचा दिवा' बनली की नेहरू घराणे, राममंदिर, मंडल आयोग, कोणताही विषय सत्तासंपादनाकरिता वापरण्याचा मोह पुढाऱ्यांना होतोच आणि लोकशाही संपते.

सरकारी हस्तक्षेपाने फळ काहीच मिळत नाही. काळा बाजार होतो, दादा-गुंड-तस्करांचे राज्य होते. हीच मंडळी अक्षरशः सरकार ताब्यात घेतात. वर नावाला लोकशाही पण प्रत्यक्षात, सर्वत्र गुंडांचे राज्य असे चित्र लगेच तयार होते.

## समर्थांना संरक्षण पांगळेच करणार

लालन-पालन, संगोपन-पोषण ही अर्भकांना आवश्यक आहे. पण ते वय संपले आणि कोडकौतुक चालू राहिले तर पोराचे भले होत नाही, तो गुळाचा गणपती बनतो.

पन्नास वर्षांच्या शोषणानंतर भारतीय शेतकरी जागतिक स्पर्धेत उभे राहाण्याची उमेद बाळगतो आणि लाडाकोडांनी पोसलेले कारखानदार स्पर्धेच्या कल्पनेनेच धास्तावले आहेत हे याचेच उदाहरण आहे.

पक्षीण पिलाला उडायला शिकवते. मोठ्या मायेने प्रेमाने त्याला उडण्यास उद्युक्त करते. एका पायरीवर ती निर्दयपणे पिलाला उंचावरून ढकलून देण्यास तयार होते. ही कठोरता ही आईच्या वात्सल्याची खरी कसोटी आहे.

पाण्यात पोहायला शिकायचे असेल तर पाण्याच्या बाजूला झोपून वर्षानुवर्षे हातपाय हालवले तर पोहायला येणार नाही. पोहायला शिकायचे तर पाण्यात उतरले पाहिजे, नाकातोंडात पाणी गेले पाहिजे, प्राण कंठाशी आले पाहिजे तेव्हा हातपाय तिरीमिरीने हालू लागतात आणि पोहण्यातील कला समजते.

## अनुभव आणि स्पर्धा यांच्यासारखे गुरु नाहीत

ही खुली व्यवस्था, खुली व्यवस्था म्हणतात, ती काय आहे? मुलियरच्या एका नाटकात एक नवश्रीमंत प्रियाराधनासाठी विद्वान बनण्याचे ठरवतो. शास्त्रीबुवांची शिकवणी लावतो. व्याकरणाच्या पहिल्याच धड्यात 'गद्य' म्हणजे काय याच्या व्याख्येचा प्रश्न येतो. बराच वेळ चर्चा चालल्यानंतर डोक्यात प्रकाश पडतो, ''म्हणजे आपण नेहमी बोलतो तेच गद्य होय?''

खुल्या व्यवस्थेचे असेच आहे. कोणी जाणूनबुजून आपल्याला बांधून टाकले नसले की त्याला म्हणायची खुली व्यवस्था. पिंजऱ्यातील पक्ष्याला किंवा वाघाला खुली व्यवस्था कसली समजावून सांगता? पिंजरा हीच दुष्ट व्यवस्था आहे. ती नसली की त्याला म्हणायचे खुली व्यवस्था.

आर्ट बुकवॉल्ड हा एक प्रख्यात अमेरिकन विनोदी लेखक. न्यूयॉर्कच्या प्रदूषित हवेत जन्म काढलेला. आर्क्टिक वृत्ताजवळील एका विमानतळावर उतरला, विमानाच्या बाहेर पडताच त्याचा जीव घाबरा होऊ लागला. 'हा कसला घाण वास आहे?' त्याने तक्रार केली. लोकांनी सांगितले, ''ही स्वच्छ हवा आहे.'' नेहरूशाही, समाजवाद, सरकारशाही यांच्या प्रदूषणाला आम्ही इतके सरावलो आहोत की खुलेपणाने काही अपाय तर होणार नाही? खुलेपणाने आम्ही गुलाम तर बनणार नाही? असले प्रश्न विचारीत आहोत.

चिनी मुलींचे लहानपणापासून पाय बांधून ठेवण्याची पद्धत होती, ते बारीक आणि नाजूक दिसावेत म्हणून. कायद्याने पाय बांधण्यास बंदी झाली, पायावरील पट्ट्या सोडण्यात आल्या तेव्हा लहान मोठ्या स्त्रिया पायातील वेदनांबद्दल तक्रार करू लागल्या, पुन्हा पट्ट्या बांधा म्हणू लागल्या. समाजवादी विचाराच्या प्रभावाने दुसऱ्याच्या जिवावर जगण्याची आणि निर्बुद्धपणे चाकोरीतील आयुष्य जगण्याची आम्हाला इतकी गोडी लागली आहे की आम्हाला मोकळे करणाऱ्यांचाच आम्ही रागाराग करतो आहोत?

लेखकाने एक सुंदर कथा सांगितली आहे. डोंगरातून खळबळ वाहात येणाऱ्या एका ओढ्याच्या शुभ्र पाण्याच्या तळाशी दगडगोटे आणि त्यात शेवाळे साचलेले. त्या शेवाळ्याच्या विश्वात अनेक जीवजंतू जिवाच्या आकांताने दगड गोट्यांना, शेवाळाला धरून राहिलेले त्यांच्या साऱ्या आयुष्याचे उद्दिष्ट फक्त ओढ्याच्या तळाला चिकटून राहाणे, त्यातील एका मनस्वी किड्यास या जगण्याचा कंटाळा येतो. आधार सोडून पाण्याबरोबर स्वच्छंदपणे वाहावे असे त्याला वाटते. सारे बुजुर्ग त्याला मरणाची धास्ती दाखवतात. पण तरी हिम्मत करून एक दिवस तो स्वतःला झोकून देतो. पाण्याचा प्रचंड ओघ त्याला उचलून या खडकावर, त्या तटावर आपटतो. तो जखमी होतो पण थोड्या वेळात आपण पाण्याच्या प्रवाहाबरोबर आनंदाने वाहात आहोत हे त्याच्या लक्षात येते. खाली तळाशी बसलेले असंख्य जीवजंतू त्याच्याकडून पाहून विस्मय करतात. 'तो तर महात्मा आहे. त्याला आपल्यासारख्या चिंता काहीच नाहीत.''

स्वातंत्र्याची चव अनुभवाने कळते, त्याची रूची अनुभवानेच वाढते. उलट

बंधने ठेवली तर त्याच्या दुःखांची सवय होते आणि बंधनेच नैसर्गिक वाटू लागतात.

## खुली व्यवस्था टप्पा नव्हे, मार्ग आहे

खुली व्यवस्था अशी काही गोष्टच नाही. इतिहासात नव्हती, वर्तमानात नाही आणि भविष्यातही कधी असणार नाही, पण खुलेपणाकडे आपण वाटचाल करून शकतो. आजच्या पेक्षा अधिक खुले होऊ शकतो. पूर्णपणे स्वतंत्र कधीच होणार नाही, पण अधिकाधिक स्वतंत्र नक्कीच होऊ शकतो.

खुली व्यवस्था म्हणजे काही स्वर्ग नाही. मार्क्सच्या वर्गविरहित समाजाप्रमाणे, गांधींच्या रामराज्याप्रमाणे ते काही स्वप्नरंजन नाही. जेथे गेल्यानंतर कोणती चिंताच उरत नाही, सर्व काही आनंदी आनंद असते हे पऱ्यांचे राज्य नाही.

खुली व्यवस्था म्हणजे कष्ट आहेत. माणसाला वारश्याने मिळालेल्या साऱ्या संस्थांचा अधिकाधिक व्यापकतेने उपयोग करून हरेक क्षेत्रात कुशलता वाढवावी यासाठी ही धडपड आहे. या धडपडीने दुःख होते, आजारही उद्‌भवतात. असली दुःखे, असले आजार गुलामांच्या वाटेस जात नाहीत. ती सहन करण्याचे भाग्य स्वातंत्र्याच्या यात्रिकांनाच मिळते. शांती, सुख, समाधान शोधणाऱ्यांना हा रस्ता झेपायचा नाही. हा रस्ता खाचखळग्यांचा आहे. काट्याकुट्यांचा आहे. म्हणूनच त्यावर चालण्यात आयुष्याचे सार्थक आहे.

## पिशाचमहालात घुसून पिशाचांना हकला

गेल्या पंधरा वर्षांच्या इतिहासात शेतकरी संघटनेने अनेक दैदीप्यमान विजय मिळविले. त्यातील दोन विशेष महत्वाचे.

एक : गरीबीचे मूळ काय? या प्रश्नाचे उत्तर. सरकार जाणीवपूर्वक, धोरणपूर्वक शेतकऱ्यांची करीत असलेली लूट हे संघटनेने आग्रहाने मांडले. सारे बुजुर्ग, पंडित, विद्वान कुचेष्टा करीत होते. आज सरकारी दस्तावेजाने संघटनेचा सिद्धांत सिद्ध झाला आहे.

दोन : सरकार उपायाची गोष्ट नाही, अपायाची आहे हे संघटनेने सांगितले, त्यावेळी बहुतेक जग सरकारवादी होते. मास्कोचा पाडाव, नेहरूशाहीचे पतन आणि डंकेल प्रस्ताव शेतकरी संघटनेच्या विचाराच्या सार्थकतेची प्रमाणपत्रे आहेत.

पंधरा वर्षांत हा चमत्कार घडला पण संघटनेला अजून काही कामे संपवायची आहेत. मुख्य शल्यक्रियाझाली आहे पण काही उपचार आवश्यक आहेत.

संघटनेच्या हाकेस शेतकऱ्यांनी आवश्यक तो प्रतिसाद दिला नाही. काही दुर्दैवी अपघात अडथळा बनून आले. १९८४ सालीच स्वातंत्र्यवर्ष साजरे व्हायला पाहिजे होते ते झाले नाही. दिरंगाई झाली.

मूळची जखम आर्थिक पण ती आता नासते आहे. शासनाच्या अर्थसत्तेतील लुडबुडीमुळे बेकारी, महागाई आणि कर्जबाजारीपणा माजलाच. पण त्या पलिकडे जाऊन आता भ्रष्टाचारी, गुन्हेगारी व पुढारी यांची युती, आणि माजलेल्या पुढाऱ्यांच्या दुसऱ्या पिढीची मायबहिणीवर हात टाकण्यापर्यंत गेलेली मजल.

रावण आणि दुर्योधन यांची सहस्र पापे. पण सतीवर हात उचलल्याने घनघोर युद्धांची सुरुवात झाली. पोटात भूक असलेला शेतकरीसुद्धा पहिल्यांदा या दुष्ट राक्षसांचे निर्दालन करा म्हणून आक्रोश करतो आहे.

१९८४ सालापर्यंत शेतकऱ्यांची लढाई नेटाने संपली असती तर शेतीमाल रोकण्याचे हत्यार पुरे पडले असते. आता शासनाच्या पिशाचमहलात घुसून त्याला तेथून हुसकावण्याची गरज आहे. काम कठीण नाही. एका भारतीय गोर्बाचेव्ह, एक भारत मार्गारेट थॅचर शत्रूच्या बालेकिल्ल्यात पोहोचली तर एकविसाव्या शतकाची सुरुवात होण्यापूर्वी 'गरीब बिचारा' समजला जाणारा भारत वैभवाकडे वाटचाल करू लागला असेल. ●

### महत्त्वाचे

*सर्व जिल्हा प्रमुखांनी आपापल्या भागातील शेतकरी संघटनेचे सर्व आजी व माजी पदाधिकारी जे अजूनही शेतकरी संघटनेच्या विचारांशी बांधील आहेत त्यांची नावे व पत्ते केंद्रीय कार्यालयाकडे त्वरीत पाठवावेत.*

## नागपूर अधिवेशन पूर्वतयारी समिती, जिल्हा औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| समन्वय समिती प्रमुख | : | डॉ. मानवेंद्र काचोळे |
| खुलताबाद | : | श्री. यासीनभाई गणोरकर |
| औरंगाबाद पूर्व | : | श्री. पुंडलीकराव उकीर्डे |
| आरैंगाबाद पश्चिम | : | श्री. देवनाथ सोनवणे |
| गंगापूर | : | श्री. मछींद्र सोनवणे |
| पैठण | : | श्री. बाबासाहेब चोरमले |
| वैजापूर | : | श्री. जी. पी. कदम |
| सिल्लोड | : | श्री. मधुकर दानवे |
| कन्नड | : | श्री. शंकर भट्टू गाडेकर |
| औरंगाबाद शहर | : | श्री. हेमंत देशमुख |

# पदवीधरांना नव्हे, खऱ्याखुऱ्या तज्ज्ञांना वाव

**श्री. बुधाजीराव मुळीक,**
स. न. वि. वि.

काल अहमदनगर मुक्कामी आपली गाठभेट झाली. आपण सध्या ज्या कामात आहात त्याचीही माहिती मिळाली. खुलीकरणाचा लाभ मिळाल्याने शेती व्यवसायास नव्या दिशा मोकळ्या झाल्या आहेत. याचा लाभ घेण्यासाठी कृषि पदवीधरांचे योगदान काय राहील? असा प्रश्न आपण विचारला आहे. देशात शेती-तज्ज्ञ आहेत. आपण मोठे जाणकार आहोत असे भासविणारे आहेत. तज्ज्ञ सारे पदवीधर आहेतच असे नाही. माझ्या परिचयातील तज्ज्ञ बहुसंख्येने पदवीधर नाहीत.

नवीन कालखंडात तज्ज्ञांचा शेतकऱ्यांचा मोठा उपयोग होणार आहे. पदवीधरातील जे जाणकार असतील त्यांचाही उपयोग होणार आहे. तज्ज्ञ आणि पदवीधर याचा स्वातंत्र्योत्तर कालखंडात शेतीशी फार थोडा संबंध राहिला आहे. विस्ताराच्या कामासाठी किंवा सल्लागार म्हणून दुसऱ्याच्या शेतीवर जाऊन सल्ला देणे आणि स्वतःच शेती करणे यात मोठे अंतर आहे. आजपर्यंत सरकारी किंवा व्यावसायिक तज्ज्ञ सल्ला देत, पण परिणामस्वरूप होणाऱ्या धोक्याची व नुकसानीची जबाबदारी घेत नसत. नोकरदार, सल्लागाराचा पगार आणि व्यावसायिक सल्लागाराचा मेहनताना शेतकऱ्यांस होणाऱ्या लाभाशी जोडलेला नसे. शेतावर जावे, सल्ला द्यावा, निघून यावे असाच सर्वसाधारण प्रकार.

नव्या कालखंडात केवळ सल्लाच देण्याचे काम करणाऱ्या तज्ज्ञांवर शेतकऱ्यांचा विश्वास बसणे कठीण जाईल. ''यांच्या सल्ल्याने इतका फायदा होणार असेल तर ते स्वतःच शेती का करत नाही? पगारी नोकरी का करतात?'' असा प्रश्न सहाजिकच उघडपणे विचारला गेला नाही, तरी शेतकऱ्यांच्या मनांत उभा राहणारच. नवीन युगात शेतकऱ्याने स्वतःच्या शेतीवर किंवा स्वतःच्या व्यवस्थापनासाठी घेतलेल्या शेतीवर आपल्या सल्ल्याचे व्यावहारिक फायद्याचे प्रत्यक्ष उदाहरण दाखवले तर अशा तज्ज्ञास मान्यता मिळण्याची शक्यता आहे.

गेल्या जवळ जवळ अर्धशतकांत शासनाने शेतकऱ्यांवर प्रचंड प्रमाणात उलटी सबसिडी लादली हे आता स्वतः शासनाने मान्य केले आहे. शेतकऱ्यांची गरिबी सरकारी धोरणांमुळे तयार झाली हे आता स्वतः सरकारने मान्य केले आहे. अनेक शेतकऱ्यांना या भीषण प्रकरणाची चांगली जाणीव आहे. साहजिकच त्यांच्या मनात आणखी एक प्रश्न उभा राहातो. या शेतीतज्ज्ञांपैकी कोणीही आजपर्यंत तोंड उघडून सरकारी धोरणातील कारस्थानाबद्दल का बोलले नाही? खते, औषधे, बियाणे, मशागत, निंदणी, फवारणी यावर अधिक खर्च करायला सांगणाऱ्या तज्ज्ञांनी हा खर्च करू नये, येणाऱ्या पिकातून फायदा हाती लागण्याची काहीही शक्यता सरकारने ठेवली नाही हे स्पष्ट करून का सांगितले नाही? जाणकार शेतकऱ्यांच्या मनात तज्ज्ञांविषयी मोठे प्रश्नचिन्ह आणि संशय निर्माण झाला आहे. तज्ज्ञांना पिके कशी काढावी हे कदाचित् समजत असेल पण त्यातून शेतकऱ्यांना दोन पैसे भेटतील किंवा नाही याविषयी तज्ज्ञांना फारसे कळत नसावे अशी शेतकऱ्यांची धारणा झाली आहे.

या पलिकडे जाऊन शेतकरीविरोधी धोरणांमुळे शेती तोट्यातच राहणार आहे हे या तज्ज्ञांना माहित होते म्हणून स्वतः शेती करण्याऐवजी शेतकऱ्यांना नुसता सल्ला देण्याचे त्यांनी पत्करले, शेतकीतज्ज्ञांनी शेतकऱ्याशी अप्रामाणिक व्यवहार केला असा संशय त्यांच्या मनात दृढ झाला असेल तर त्यांना दोष कसा द्यावा?

यापुढे तज्ज्ञांनी सल्ला देण्याचे काम टक्केवारीवर करावे असे मी सुचवितो. त्यांच्या सल्ल्याने शेतकऱ्यांचा जो निव्वळ फायदा होईल त्यातील काही भाग तज्ज्ञास मिळावा अशा प्रकारचा करार केल्यास शेतकऱ्यांना काही विश्वास वाटू लागेल.

याहीपेक्षा एक चांगला मार्ग आहे. शेतकी तज्ज्ञांनी आपल्या व्यवस्थापनाखाली जमीन भाडेपट्टीने अथवा दुसऱ्या कोणत्याही पद्धतीने एकत्र आणावी. हजार-दोन हजार एकर जमिनीवर आपल्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा ठोस पुरावा द्यावा. स्वतःही फायदा मिळवावा व जमीनमालकाला अधिक उत्पन्न मिळवून द्यावे. पंजाबमध्ये अशा प्रकारच्या योजनांना शेतकऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिल्याचे कळते.

खुली व्यवस्था येऊ लागल्यापासून शाळेचे तोंडसुद्धा न पाहिलेल्या अनेक शेतकऱ्यांनी उत्पादन, व्यापार, निर्यात या क्षेत्रांत मोठी करामत करून दाखवली आहे. नवे नवे तंत्रज्ञान तो शिकू पाहत आहे आणि शोधू पाहात आहे. या कामांत त्याला खऱ्याखुऱ्या तज्ज्ञांचा खूप उपयोग होईल व त्यांचा तो भरपूर मेहनताना देण्यास तयार होईल. पण विस्तार योजनांप्रमाणे किंवा बेनॉर पद्धतीप्रमाणे शेतकऱ्यांकडे येणाऱ्या पगारी सल्लागाराना कांही स्थान भविष्यांत राहील असे दिसत नाही. तज्ज्ञ म्हणवणाऱ्या नोकरदार सल्लागाराची सद्दी संपली आहे. शेतकऱ्यांची भागीदारी करण्यास तयार असलेल्या खऱ्याखुऱ्या तज्ज्ञांना मोठा वाव नव्या कालखंडाने तयार करून दिला आहे. असे तज्ज्ञ कोठे आणि किती गवसतील ते पहावे लागेल. पुण्याला आपण जमा करत असणाऱ्या पदवीधरांमध्ये काहीतरी असे सापडतील अशी मला खात्री आहे.

आपल्या उपक्रमास शुभेच्छा!

आंबेठाण — आपला,
३-१०-९४ — **शरद जोशी**

**१६ ऑक्टोबर १९९४ रोजी कृषिभूषण डॉ. बुधाजीराव मुळीक यांच्या 'भूमाता' या संस्थेतर्फे कृषिपदवीधरांचे 'अखिल महाराष्ट्र संमेलन' आयोजित करण्यात आले आहे. दहा ते पंधरा हजार कृषिपदवीधर हजर राहाण्याची अपेक्षा असलेल्या या संमेलनाच्या वेळी '२००० सालातील अपेक्षित कृषिव्यवस्था, नियोजन, दिशा, आव्हाने, संधी व अपेक्षित फलप्राप्तीस कृषिपदवीधरांचे योगदान' या विषयावर स्मरणिका काढण्यात येणार आहे. या स्मरणिकेसाठी लेख देण्याची विनंती करणारे पत्र श्री. शरद जोशी यांना डॉ. मुळीक यांनी पाठविले. या पत्राला श्री. शरद जोशींनी दिलेले उत्तर.**

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On October 6, 1994

**To**

SHETKARI SANGHATAK
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
October 6, 1994

PNCW 281
Licence to post without prepayment
No. 87

**सक्षम उद्योजकतेची हत्या करणाऱ्या आणि
कल्याणकारी अर्थव्यवस्थेच्या नावाने संपूर्ण समाजाला पंगू करणाऱ्या
समाजवादाला फेकून देऊन उद्योजकवादाच्या संस्कृतीचे स्वागत करण्यासाठी**

महिला आघाडी

# संयुक्त अधिवेशन नागपूर

शेतकरी संघटना

## *खुले अधिवेशन : १२ नोव्हेंबर १९९४*
## *ठिकाण : कस्तुरचंद पार्क, नागपूर.*
## *सायंकाळी ५ वाजता*

**शेतकऱ्यांना हजारो वर्षांच्या आर्थिक गुलामगिरीतून बाहेर पडण्यासाठी
खात्रीशीर प्रयत्न करण्याची संधी देणाऱ्या खुल्या व्यवस्थेला अडथळा आणणाऱ्या**
आणि समाजवादाच्या छत्राखाली पोसलेल्या सरकारशाही, नोकरशाही, गुंडपुंडगिरी आणि
सरकारच्या नामर्दपणामुळे उन्मत्त झालेल्या जातीयवादी शक्तींना
निष्प्रभ करण्यासाठी लाखोंच्या संख्येने हजर रहा.

**सौ. सरोज काशीकर**
अध्यक्ष, शेतकरी महिला आघाडी

**पाशा पटेल**
अध्यक्ष, शेतकरी संघटना

**श्री. पी. एस्. ठाकरे**
स्वागताध्यक्ष, शे. सं. ६ वे अधिवेशन

**श्री. राम नेवले**
कार्याध्यक्ष, शे. सं. ६ वे अधिवेशन

६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.
प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता
अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे.

संपादक, मुद्रक, प्रकाशक
सुरेशचंद्र म्हात्रे
फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८
एस्.टी.डी.- ०२१३५

पाक्षिक शेतकरी संघटक
मालक — मोहन बिहारीलाल परदेशी
मुद्रण स्थळ — गणेश प्रिंटर्स,
६९३, बुधवार पेठ, पुणे - २.